

दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे



वर्ष ६ ▪ अंक ५८ ▪ शनिवार २८ नोव्हेंबर २०२६ ▪ पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

मामाच्या घरात भाच्यानेच केला हात साफ!

कोतवाली पोलिसांकडून अवघ्या पाच तासांत गुन्ह्याची उकल । फिर्यादीचा सर्व मुद्देमाल हस्तगत



५०० रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेल्याची तक्रार पारख यांनी २१ नोव्हेंबर रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात दिली होती. त्यानुसार भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०५ (अ) अन्वये घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी गुन्हे शोध पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक विशाल चिटणीस व त्यांच्या पथकाला तपासाचे ▪ पान ४ वर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– रक्ताच्या नात्याला काळिमा फासत भाच्यानेच मामाच्या घरात चोरी करून सुमारे साडेचौदा लाख रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने लांबविल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी अत्यंत कौशल्याने आणि तांत्रिक तपासाच्या जोरावर अवघ्या पाच तासांत गुन्ह्याची उकल केली. विशेष म्हणजे, चोरीला गेलेला १४ लाख ४७ हजार ५०० रुपयांचा शंभर टक्के मुद्देमाल हस्तगत करून फिर्यादीस सुखरूप परत मिळवून देण्याची कौतुकास्पद कामगिरी पोलिसांनी केली आहे.

आदिनाथ कॉलनी, मार्केट यार्ड रोड येथे राहणारे शुभम संतोष पारख (वय २८) यांच्या घरात १४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते १९ नोव्हेंबरच्या सकाळी ९ वाजेदरम्यान ही चोरी झाली होती. अज्ञात चोरट्याने घरातील १४ लाख ४७ हजार

तपासात सहभागी पथक

ही यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे आणि कोतवालीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक विशाल चिटणीस, पोलीस हेडकॉन्स्टेबल बाळकृष्ण दोंड, साबीर शेख, विशाल दळवी, राहुल शिंदे, विनोद बोरगे, पोलीस कॉन्स्टेबल शिरीष तरटे, संदीप शिरसाठ, सुरज कदम, अतुल कोतकर, संकेत धिवर, रमेश शिंदे, अतुल लाटे, वैभव काळे, आकाश काळे, सत्यम शिंदे, महिला पोलीस कॉन्स्टेबल पूजा खांदवे आणि दक्षिण मोबाईल सेलचे पोलीस कॉन्स्टेबल अरुण सांगळे यांनी पार पाडली.

शहीद कारसेवक कोठारी बंधूंना अभिवादन

रक्तदान केल्याने अनेकांना जीवनदान मिळते- आमदार संग्राम जगताप

विश्व हिंदू परिषदेचे रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– प्रभू श्रीराम मंदिर निर्माण साठी राम कोठारी व शरद कोठारी बंधूंनी दिलेले बलिदान पिढ्यानपिढ्या न विसरणारे आहे.कोठारी बंधूंचे विचारांनी प्रेरित होऊन रक्तदानाच्या कार्यात मोठा प्रतिसाद मिळत आहे.तसेच अध्यात्मिक, धार्मिक व सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे गजेंद्र सोनवणे यांचा जन्मदिनी दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते.रक्तदान केल्याने अनेकांना जीवनदान मिळते. असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले आहे.

विश्वहिंदु परीषद मंदिर,अर्चक,पुरोहित आयामाचे वतीने शहीद कारसेवक राम कोठारी व शरद कोठारी बंधूंच्या बलिदान स्मृतीस अभिवादन व भारतमातेचे पूजन करुन रक्तदान शिबिराचे उद्घाटन कोतवाली पोलिस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक समाधान सोळंके यांचे हस्ते करण्यात आले.यावेळी प्रमुख उपस्थितीत आमदार संग्राम जगताप,जनकल्याण रक्तकेंद्राचे संचालक सुधीर लाडगे,प्रशासकिय अधिकारी सागर उंडे,विश्व हिंदू परिषद मंदिर,अर्चक,पुरोहित आयामाचे विभाग प्रमुख ▪ पान ४ वर

एलसीबीची जिल्ह्यात २५ ठिकाणी छापेमारी

अवैध धंद्यांविरोधात मोहिमेत ४ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने धडक मोहीम हाती घेतली आहे. शुक्रवारी (दि. २७) जिल्ह्यातील विविध भागांत अवैध दारू, जुगार आणि गुटख्याच्या अड्ड्यांवर एकाच वेळी २५ ठिकाणी छापे टाकून पोलिसांनी ४ लाख ३ हजार ९१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांत २५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांची गोपनीय माहिती काढून थेट कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पथकांची नेमणूक करून जिल्ह्यात विविध ठिकाणी छापेमारीचे नियोजन केले. या मोहिमेअंतर्गत पथकाने अवैध दारूचे १४, जुगाराचे ८ आणि गुटख्याचे ३ अशा एकूण २५ अड्ड्यांवर धाडी टाकून अवैध व्यावसायिकांना मोठा दणका दिला. यामध्ये सर्वाधिक कारवाई श्रीगोंदा, जामखेड आणि अकोले पोलीस ठाण्यांच्या हद्दीत करण्यात आली आहे.



कारवाईचा तपशील

अवैध दारू (एकूण १४ गुन्हे) – जामखेड (६ गुन्हे), श्रीगोंदा (३ गुन्हे), अकोले (२ गुन्हे), राजूर (२ गुन्हे), पाथर्डी (१ गुन्हा). अवैध जुगार (एकूण ८ गुन्हे) – अकोले (४ गुन्हे), पाथर्डी (३ गुन्हे), श्रीगोंदा (१ गुन्हा) अवैध गुटखा (एकूण ३ गुन्हे) – श्रीगोंदा (१ गुन्हा), राजूर (२ गुन्हे). एकूण २५ गुन्हे दाखल करून ४ लाख ३ हजार ९१५ रुपयांचा मुद्देमाल जप्तकरण्यात आला आहे.

पथकात यांचा सहभाग

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या पथकात पोलीस अंमलदार अतुल लोटके, भाऊसाहेब काळे, रोहित मिसाळ, दीपक जाधव, अशोक लिपणे, किशोर शिरसाठ, योगेश कर्डीले, बिरप्पा करमल, प्रताप देवकाते, अमोल कोतकर, मनोज साखरे, शामसुंदर जाधव, भगवान धुळे, रणजीत जाधव, सोमनाथ झांबरे, अरूण गांगुर्डे, गणेश धोत्रे आणि गणेश लबडे यांचा सहभाग होता.

आष्टीच्या व्यापारी कुटुंबातील महिलेचा अपघातात मृत्यू

गंगापूरजवळ बलेनो–ब्रेझा कारची समोरासमोर धडक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– आष्टी (जि. बीड) येथील कापड व्यापारी राजेंद्र जोशी यांच्या कारला गंगापूरजवळ झालेल्या भीषण अपघातात त्यांच्या पत्नी विद्या राजेंद्र जोशी (वय ५८) यांचा मृत्यू झाला. तर राजेंद्र जोशी (वय ६३), कलावती जोशी (वय ८०) यांच्यासह अन्य प्रवासी जखमी झाले आहेत. या दुर्घटनेत दोन कारची समोरासमोर जोरदार धडक होऊन दोन्ही वाहनांचा अक्षरशः चक्काचूर झाला.

आष्टी येथील जोशी कुटुंब गंगापूर येथे नातेवाइकांकडे गेले होते. तेथून शुक्रवारी रात्री आष्टीकडे परतत असताना गंगापूर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील सिद्धार्थ जिनिंगसमोर रात्री सुमारे ९.५० वाजता हा अपघात झाला. जोशी कुटुंब प्रवास करीत असलेल्या मारुती सुझुकी बलेनो कार (एमएच २३ एडी ४२५९) ची गंगापूरच्या दिशेने येणाऱ्या मारुती सुझुकी ब्रेझा कार (एमएच २० ईवाय ३३७३) शी समोरासमोर जोरदार धडक झाली. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. वाहनांमध्ये अडकलेल्या जखमींना बाहेर काढण्यासाठी नागरिकांनी मदत केली. त्यानंतर जखमींना गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर ▪ पान ४ वर

संगमनेरात किराणा दुकानातून साडेपाच लाखांचा गुटखा जप्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– संगमनेर शहरातील राजापूर रोडवरील एका किराणा दुकानातून सुरू असलेल्या अवैध गुटखा विक्रीवर स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून एका आरोपीला ताब्यात घेतले. या ठिकाणाहून गुटखा, सुगंधीत तंबाखू व मारूती इको कार असा एकूण ५ लाख ५८ हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्याच्या पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पथक तयार करून संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत रवाना केले होते. दिनांक २७ नोव्हेंबर रोजी पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, दिनेश शेलकर हा राजापूर रोडवरील आपल्या श्लोक किराणा दुकानातून अवैध गुटख्याची विक्री करत आहे.

पथकाने दुकानाची व समोर उभ्या असलेल्या मारूती इको गाडीची झडती घेतली असता गुटखा आढळून आला. याप्रकरणी दिनेश मच्छिंद्र शेलकर (वय ३८, रा. राजापूर रोड, संगमनेर) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून २२ हजार ५६० रुपयांचा हिरा पानमसाला, २२ हजार ६८० रुपयांचा डायरेक्टर स्पेशल पानमसाला, १३ हजार ७४० रुपयांची सुगंधीत तंबाखू आणि ५ लाख रुपयांची मारूती इको कार (एमएच-१७-सीएम-८४१३) असा एकूण ५ लाख ५८ हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीला मुद्देमालासह ▪ पान ४ वर

कारवाई करणारे पथक

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलीस अंमलदार सोमनाथ झांबरे, अरुण गांगुर्डे, गणेश धोत्रे, गणेश लबडे, रणजीत जाधव व प्रकाश मांडगे यांनी ही कारवाई केली.

सरकारी जमिनीवरील २०११ पर्यंतची

निवासी अतिक्रमणे नियमित करण्याच्या हालचालींना वेग

मुंबई । वृत्तसंस्था– राज्यातील सरकारी जमिनीवरील २०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे नियमित करण्याच्या प्रक्रियेला राज्य सरकारने मोठा वेग दिला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासाठी विधानसभास्तरीय आढावा समितीच्या सहअध्यक्षांची नियुक्ती केली असून, राज्यात ११५ सहअध्यक्षांच्या नियुक्तीचा अधिकृत शासन निर्णय (जीआर) जारी करण्यात आला आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो सर्वसामान्य कुटुंबांच्या डोक्यावरील बेघर होण्याची टांगती तलवार कायमची दूर होणार आहे. तसेच, वर्षानुवर्षे सरकारी जमिनीवर वास्तव्य करणाऱ्या या कुटुंबांना त्यांच्या घरांचा कायदेशीर मालकी हक्क मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. शासनाच्या या लोककल्याणकारी निर्णयाची अंमलबजावणी प्रभावीपणे आणि पारदर्शकपणे व्हावी, यासाठी विधानसभा मतदारसंघनिहाय आढावा समित्यांवर ११५ सहअध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामुळे प्रलंबित प्रकरणे मार्गी लागून सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. याशिवाय आणखी एक क्रांतिकारी निर्णय म्हणजे राज्यातील शहरी भागातील सदनिका धारकांना आता खिशात सहज ठेवता येईल असं डिजिटल प्रॉपर्टी कार्ड ▪ पान ४ वर

मुकुंदनगरला साडेपाचशे किलो गोमांस जप्त



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– मुकुंदनगर परिसरातील अवैध गोमांस विक्रीवर स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून ५५० किलो गोमांसासह एकूण १ लाख ६६ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, मुद्देमालाचा मुख्य मालक फरार आहे.

एसपींच्या आदेशानुसार अवैध धंद्यांवर कारवाईसाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस अंमलदार संदीप पवार, अरविंद भिंगारदिवे, शाहीद शेख आणि अमृत आढाव यांचे विशेष पथक तयार केले होते. दिनांक २७ नोव्हेंबर रोजी हे पथक भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनच्या हद्दीत गस्त घालत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, संजोगनगर (मुकुंदनगर) येथील नूर बानु शेख ▪ पान ४ वर

महायुती सरकार ताजनापूर योजनेतून शेतकऱ्यांना न्याय देईल – ना.विखे पाटील

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– महायुती सरकारच्या माध्यामातून ताजनापूर उपसा सिंचन योजनेच्या तिसर्या टप्प्याचे काम पूर्ण होईल. दुष्काळी भागातील गावांना न्याय देण्याच्या उद्देशाने जलसंपदा विभाग काम करेल आशी ग्वाही मंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. ताजनापूर उपसा सिंचन योजनेकरीता निधीची उपलब्धता करून दिल्याबद्दल लाभक्षेत्रातील शेतकर्यांनी जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांचा सत्कार केला. आ.मोनिका राजळे अजय रक्ताटे यांच्यासह लाभ क्षेत्रातील शेतकरी उपस्थित होते.

ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा एकचे पुनरुज्जीवन करण्यासाठी यांत्रिकी विद्युत व स्थापत्य कामासाठी २०कोटी ८८लाख रुपयांचा निधी आणि तिसर्या टप्प्याच्या सर्सर्व्हेक्षणासाठी ६३लाख रुपयांच्या निधीस मंत्रालयात झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली.झालेल्या महत्वपूर्ण निर्णयाच्या पार्श्वभूमीवर लाभक्षेत्रातील शेतकर्यांनी तसेच भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी आ.मोनिका राजळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयात मंत्री विखे पाटील यांचा सत्कार करून आभार मानले. तालुक्यातील आठ गावांमधील सुमारे २हजार ७४४हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.योजनेच्या टप्पा क्र एक विस्तारीत मध्ये १३ गावांचा समावेश करण्यात आला असल्याचे सांगून मंत्री विखे पाटील म्हणाले की,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने दुष्काळमुक्त महाराष्ट्र करण्यासाठी सुरू केलेल्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून ताजनापूर उपसा सिंचन योजनेच्या तिसर्या टप्प्याचा निर्णय केला असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी शेतकरी ▪ पान ४ वर

दै. आकर्षण निवडक

मुलींच्या आरोग्यासाठी कृष्णप्रित वेलफेअर फाउंडेशनचा पुढाकार



अहिल्यानगर- मुकुंदनगर (फकीरवाडा) येथील यशवंत माध्यमिक विद्यालयात कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने मासिक पाळी स्वच्छता व किशोरवयीन आरोग्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. होगनस इंडिया प्रा. लि. यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत आयोजित या कार्यक्रमात किशोरवयीन मुलींना मासिक पाळीच्या काळात घ्यावयाची स्वच्छता, आरोग्याची काळजी आणि योग्य सवयी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विद्यालयाला सॅनिटरी पॅड डिस्पोजल मशीन प्रदान करण्यात आली. तसेच विद्यार्थिनींना सॅनिटरी पॅडचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमात डॉ. नयना जगताप यांनी विद्यार्थिनींना मासिक पाळीच्या काळातील स्वच्छता, आरोग्यविषयक काळजी आणि योग्य सवयी याबाबत मार्गदर्शन केले. किशोरवयीन मुलींमध्ये मासिक पाळीविषयी असलेले गैरसमज दूर करून त्यांच्यात आरोग्य व स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमास होगनस कंपनीच्या एचआर नम्रता गायकवाड यांची विशेष उपस्थिती होती. तसेच संचालिका डॉ. प्रांजल गाडे-लामखडे, संस्थापक अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके, संचालिका प्रियंका पाटील शेळके, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका बनकर मॅडम, अमर बोबडे व श्रेयस दुसिंग उपस्थित होते. कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनच्या माध्यमातून किशोरवयीन मुलींच्या आरोग्यविषयक समस्या समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. विद्यालयाला सॅनिटरी पॅड डिस्पोजल मशीन प्रदान केल्यामुळे विद्यार्थिनींना स्वच्छतेच्या दृष्टीने सुविधा उपलब्ध होणार आहेत.

महिला आरक्षणाला पाठिंबा

अहिल्यानगर - महिला आरक्षणाला पूर्ण पाठिंबा असला, तरी संसद सदस्यसंख्या वाढविण्याच्या प्रस्तावाला पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेने विरोध दर्शविला आहे. संसदेतील निष्क्रिय कामकाज, वाढत्या सुविधा आणि पेन्शनवरील खर्चाचा अतिरिक्त आर्थिक भार जनतेवर टाकू नये, अशी भूमिका घेत दोन्ही संघटनांनी या प्रस्तावाविरोधात आंदोलनाची घोषणा केली आहे. महिलांना संसदेत आरक्षण मिळालेच पाहिजे; मात्र त्यासाठी संसद सदस्यसंख्या वाढवून जनतेवर अतिरिक्त आर्थिक भार टाकण्याची आवश्यकता नाही, अशी भूमिका ज्येष्ठ विधितज्ज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी मांडली. संघटनांनी उपस्थित केलेल्या भूमिकेनुसार, जनतेच्या पैशातून चालणारी संसद जनतेच्या प्रश्नांवर किती प्रभावीपणे काम करते, याचा आधी हिशेब दिला पाहिजे. संसदेचे कामकाज वर्षानुवर्षे निष्प्रभ राहणार आणि त्याचवेळी सदस्यसंख्या, सुविधा व पेन्शनवरील खर्चही वाढणार, ही लोकशाहीची सेवा नव्हे, असा सवाल संघटनांनी उपस्थित केला आहे. संसदेमधील चर्चेची गुणवत्ता, कामकाजाचे दिवस, जनतेप्रती उत्तरदायित्व आणि सार्वजनिक निधीचा विनियोग यांचे मूल्यमापन झाल्याशिवाय सदस्यसंख्या वाढविण्याचा निर्णय घेऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे. महिला आरक्षण हा समान प्रतिनिधित्वाचा आणि लोकशाहीचा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे झालीच पाहिजे. मात्र, महिला आरक्षणाच्या नावाखाली संसदेचा विस्तार आणि जनतेवरील आर्थिक भार अपरिहार्य असल्याचे गृहीत धरू नये, असे संघटनांनी स्पष्ट केले आहे. प्रतिनिधित्व वाढविण्याचे पर्याय पारदर्शकपणे तपासले जावेत. त्याचबरोबर संसदीय कामकाजाची जबाबदारीही निश्चित करण्यात यावी, अशी भूमिका संघटनांनी घेतली आहेसंघटनांच्या मते, भारतीय संसद ही केवळ सत्तेची केंद्रीकृत रचना न राहता राष्ट्रीय तिरंगा धारणालयाची गंगोत्री बनली पाहिजे. येथे लोकभक्ती, ज्ञानभक्ती, कर्मभक्ती, घटनात्मक नैतिकता आणि रिकॉन्शिओ शासनतत्त्व यांना सर्वोच्च स्थान मिळाले पाहिजे. राष्ट्रनिर्मितीचे ज्ञान संसदेत एकत्रित होऊन त्याचे रूपांतर लोककल्याणकारी निर्णयांमध्ये झाले पाहिजे. स्वातंत्र्य मिळाले; आता लोकशाहीला सामूहिक विवेक, उत्तरदायित्व आणि जनहिताच्या कृतीतून अर्थपूर्ण बनविण्याची वेळ आली आहे, असे संघटनांचे प्रतिपादन आहे.

संत रामपालजी महाराजांच्या ५१३ व्या दिव्यधर्म यज्ञ दिनानिमित्त ढवळपुरी येथे रक्तदान शिबिर

४०० ते ५०० रक्तपिशव्या संकलित करण्याचे उद्दिष्ट; मानवसेवेचा संदेश देत वर्षभर विविध सामाजिक उपक्रम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



पारनेर– मुनीन्द्र धर्मार्थ ट्रस्ट, कुरुक्षेत्र (हरियाणा) यांच्या वतीने संत रामपालजी महाराज यांच्या ५१३ व्या दिव्य धर्म यज्ञ दिनानिमित्त २४ नोव्हेंबर रोजी अहिल्यानगरमधील ढवळपुरी येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. संत रामपालजी महाराज यांच्या पावन उपस्थितीत आयोजित या उपक्रमातून मानवसेवा, सामाजिक बांधिलकी आणि गरजू रुग्णांना मदतीचा संदेश देण्यात आला. दिवाळीनंतर रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा तुटवडा जाणवू लागल्याने गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, या उद्देशाने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अहिल्यानगर ब्लड बँकेच्या पथकाने शिबिरात रक्तसंकलनाचे कार्य पार पाडले.

यावेळी भगवान दास यांनी शिबिराच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, दिवाळीनंतर रक्ताची मागणी वाढत असताना रक्तसाठा कमी पडण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून रक्ताची उपलब्धता वाढविणे गरजेचे आहे. या शिबिरातून ४०० ते ५०० रक्तपिशव्या संकलित करण्याचा आयोजकांचा मानस असून, गरजू रुग्णांना वेळेवर रक्त मिळावे आणि रक्ताअभावी कोणत्याही रुग्णाची गैरसोय होऊ नये, हा मुख्य उद्देश आहे. रक्तदान हे मानवतेचे श्रेष्ठ कार्य असून प्रत्येकाने सामाजिक जबाबदारी म्हणून रक्तदानासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

अहिल्यानगर ब्लड बँकेच्या वतीने डॉ. शिनारे सर, जनसंपर्क अधिकारी श्रीरामदास शेवाळे आणि त्यांच्या संपूर्ण स्टाफने रक्तसंकलन व शिबिर व्यवस्थापनासाठी सहकार्य केले. संजय मुळे, संदीप हजारे, हेमा निकाळजे, सानिया पठाण, आशिष वाघमारे, विशाल वाघमारे, संजना धाडगे, क्षितिजा जाधव आणि उज्वला सुपेकर यांनी शिबिराच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. रक्तदात्यांना प्रोत्साहन देणे, शिबिराची व्यवस्था करणे आणि रक्तदान प्रक्रियेत सहकार्य करणे, अशा विविध जबाबदाऱ्या उपस्थित सेवाभावी कार्यकर्त्यांनी पार पाडल्या.

मुनीन्द्र धर्मार्थ ट्रस्टच्या वतीने वर्षभर विविध सामाजिक उपक्रम, सेवाभावी कार्यक्रम आणि मानवहिताचे कार्य राबविण्यात येत आहे. धार्मिक कार्यक्रमांसोबत समाजातील गरजू घटकांना मदत करणे, मानवतेची भावना वृद्धिंगत करणे आणि सामाजिक बांधिलकी जपणे, या उद्देशाने ट्रस्ट सातत्याने कार्यरत आहे. रक्तदान शिबिरासारख्या उपक्रमांतून समाजात सेवाभाव, सहकार्य आणि माणुसकीची भावना अधिक दृढ होत असून, गरजू रुग्णांना जीवनदान देणाऱ्या या कार्यात नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले.

२६ वर्षांनंतर पुन्हा भरली मैत्रीची शाळा!

काळ बदलला, जबाबदाऱ्या वाढल्या; पण मैत्रीचा ओलावा कायम! शासकीय तंत्रनिकेतनच्या १९९७–२००० स्थापत्य शाखेतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– काळाच्या ओघात प्रत्येकाचे मार्ग वेगवेगळे झाले, नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने अनेकजण वेगवेगळ्या शहरांत स्थायिक झाले, आयुष्यातील जबाबदाऱ्याही वाढल्या; मात्र महाविद्यालयीन जीवनात जुळलेली मैत्री आणि त्या काळातील आठवणींची वीण आजही तितकीच घट्ट असल्याचा भावस्पर्शी प्रत्यय शासकीय तंत्रनिकेतन, अहमदनगर येथील १९९७ ते २००० या कालावधीत स्थापत्य (सिव्हिल) शाखेत शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्यात आला. तब्बल २६ वर्षांनंतर पुन्हा एकत्र आलेल्या या मित्र-मैत्रिणींनी जुन्या आठवणींना उजाळा देत महाविद्यालयीन जीवनातील सुवर्णक्षण पुन्हा एकदा अनुभवले. हास्यविनोद, मनमोकळ्या गप्पा, आनंदाश्रू आणि जुन्या आठवणींनी हा स्नेहमेळावा अविस्मरणीय ठरला.

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसह चेन्नईसारख्या दूरच्या शहरात नोकरी आणि व्यवसायानिमित्त स्थायिक झालेले माजी विद्यार्थी या स्नेहसोहळ्यासाठी आवर्जून उपस्थित राहिले. विशेष म्हणजे माजी विद्यार्थिनींचीही लक्षणीय उपस्थिती होती. अनेक वर्षांनंतर एकमेकांना प्रत्यक्ष भेटल्यावर सुरुवातीला एकमेकांना ओळखण्याचा प्रयत्न, जुन्या टोपणनावांची उजळणी आणि त्यानंतर सुरू झालेला हास्यविनोदाचा सिलसिला यामुळे जणू काळ उलट फिरल्याचा अनुभव सर्वांनी घेतला.

या भेटीत प्रत्येकाने महाविद्यालयीन जीवनातील आठवणी, गंमतीजमती, अनुभव आणि आयुष्यातील यशापयशाचा प्रवास मनमोकळेपणाने कथन केला. सध्या कोणत्या क्षेत्रात कार्यरत आहोत, कोणत्या जबाबदाऱ्या सांभाळत आहोत, याची माहिती देतानाच एकमेकांच्या प्रगतीचे कौतुकही करण्यात आले. अनेक वर्षांनंतर पुन्हा आपल्या जुन्या वर्गात बसण्याचा अनुभव सर्वांसाठी विशेष भावनिक ठरला. ज्या बाकांवर बसून भविष्यातील स्वप्ने रंगवली होती, त्याच वर्गात पुन्हा एकत्र बसताना जुन्या दिवसांच्या आठवणींनी सर्वांनाच भूतकाळात नेले.

यानंतर माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील कार्यशाळा, वसतिगृह आणि स्थापत्य विभागाला भेट देत जुन्या आठवणींना उजाळा दिला. महाविद्यालयात झालेल्या बदलांची आणि सध्याच्या शैक्षणिक व्यवस्थेची माहिती घेत व्यवस्थापन व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. महाविद्यालय परिसरात स्नेहमेळावा आयोजित करण्यासाठी परवानगी व सहकार्य दिल्याबद्दल माजी विद्यार्थ्यांनी प्राचार्यांचे आभार मानले.

या स्नेहमेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ स्वतःच्या आठवणींमध्ये रमून न राहता सध्या महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठीही काहीतरी करण्याचा सकारात्मक विचार यावेळी मांडण्यात आला. विद्यार्थ्यांना तांत्रिक मार्गदर्शन, करिअरविषयक सल्ला तसेच व्यावसायिक क्षेत्रातील संधींबाबत सहकार्य करण्याचा संकल्प माजी विद्यार्थ्यांनी केला. त्यामुळे या स्नेहमेळाव्याला सामाजिक बांधिलकीची सकारात्मक दिशा मिळाली.

याप्रसंगी प्राचार्य आगरकर सर यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. स्थापत्य विभागप्रमुख प्रा. बैस सर, प्रा. हरिप सर, श्रीमती वानखेडे मॅडम, श्रीमती सय्यद मॅडम तसेच महाविद्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

महाविद्यालय भेटीनंतर सर्वांनी एकत्रित स्नेहभोजनाचा आनंद घेतला. त्यानंतर टर्फवर क्रिकेट खेळताना पुन्हा एकदा कॉलेज जीवनातील उत्साह आणि खोडकरपणा अनुभवायला मिळाला. मैदानावर वयाचे भान विसरून रंगलेला क्रिकेटचा सामना, मित्रांनी केलेली एकमेकांची खेचाखेची, जुन्या आठवणींवरील हास्याचे फवारे आणि मनसोक्त गप्पा यामुळे वातावरण अक्षरशः महाविद्यालयीन दिवसांसारखे झाले होते. आयुष्याच्या धावपळीत मागे पडलेले मैत्रीचे क्षण पुन्हा जगण्याची ही संधी प्रत्येकासाठी अनमोल ठरली.

रक्तदानामुळे आत्मविश्वास वाढतो – डॉ. सतीश राजुरकर

आयटीआयच्या दीडशे विद्यार्थ्यांनी बजावला रक्तदानाचा हक्क सलग अठरा वर्षापासून आयटीआयमध्ये रक्तदानाचा उपक्रम



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– सध्याचे विज्ञान बायोटेक्नॉलॉजी किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता अद्याप कृत्रिमरीत्या रक्त तयार करू शकलेली नाहीत. त्यामुळे अपघात,अतिरक्तस्राव, दुखापत, गरोदरपणातील गुंतागुंत किंवा शस्त्रक्रियेच्या वेळी रुग्णांचा जीव वाचवण्यासाठी रक्तदानाशिवाय पर्याय नाही. रक्तदान हे केवळ पुण्याचेच नव्हे, तर समोरच्या व्यक्तीचा जीव वाचवणारे अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे.शरीरात रक्ताची निर्मिती ही निरंतर चालणारी प्रक्रिया असल्यामुळे रक्तदानाचे कोणतेही दुष्परिणाम नाहीत उलट त्यामुळे आत्मविश्वास वाढतो शरीर निरोगी राहण्यास मदत होते. अलीकडच्या काळात महिला तसेच तरुण पिढीमध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी आढळत असल्याने रक्ताचे प्रमाण वाढवण्यासाठी प्रत्येकाने शरीर आणि मन सुदृढ व निरोगी ठेवावे असे प्रतिपादन अहिल्यानगर महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांनी केले.

भारतीय संविधान दिनानिमित्त व २६/११ च्या शहीद जवानांना श्रद्धांजली निमित्त कै. माणिकराव नरसिंगराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (), रोटरी क्लब ऑफ इंटिग्रिटी एचडीएफसी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयटीआय कॉलेज येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते .याप्रसंगी डॉ. राजुरकर बोलत होते याप्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. सईद शेख सचिव उदयभानसिंग परदेशी आयएमसी () सदस्य चंद्रकांत काळोखे,कैलास टेकाळे, माजी अध्यक्ष शुभश्री पटनाईक रवी डीक्रूझ, निखिल कुलकर्णी, डी. आर. जाधव विठ्ठल वांडेकर, ज्योत्स्ना ससाणे, एनएसएस कार्यक्रम अधिकारी अनिल वाघ, सुदर्शन गावंडे, एचडीएफसी बँक चे रुपेश दुधाणी, विकास शेंडगे आदीसह शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना रोटरी क्लब ऑफ इंटिग्रिटीचे अध्यक्ष डॉ. सईद शेख म्हणाले की रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान आहे रक्तदान हे सर्वोत्तम सामाजिक कार्य असून एखाद्या गरजूचे प्राण वाचवण्यासाठी केलेले रक्तदान हे खऱ्या अर्थाने जीवनदान ठरते मानवाने विज्ञान व तंत्रज्ञानात कितीही प्रगती केली असली तरी रक्ताला कोणताही पर्याय उपलब्ध झालेला नाही एखाद्याचे प्राण वाचवताना जात धर्म किंवा गटापेक्षा माणूस म्हणून पुढे येणे महत्त्वाचे आहे . रोटरी ही गेल्या शंभर वर्षांहून अधिक काळ सामाजिक कार्यात कार्यरत असलेली आंतरराष्ट्रीय संस्था असून १९४८ पासून आपल्या नगरमधे विविध उपक्रमांद्वारे समाजसेवा करत आहे. रक्तदान शिबिरे, नैसर्गिक आपत्तीतील मदत तसेच जगभरातून पोलिओ निर्मूलनासाठी राबवण्यात आलेल्या मोहिमांमध्ये रोटरी क्लबचे मोठे योगदान राहिले असल्याचे ते म्हणाले. यावेळी कैलास टेकाळे म्हणाले की गेल्या अठरा वर्षापासून आयटीआय कॉलेजमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते सालाबाद प्रमाणे याही वर्षी कॉलेजच्या दीडशे विद्यार्थ्यांनी रक्तदानाचा हक्क बजावत २६/११ मधील शहिदांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय धोंगडे यांनी केले आभार अविनाश गुंफेकर यांनी मानले.

आचार्य प्र.के अत्रे नाट्यगृह सासवडमध्ये रंगला 'पापी पेट का सवाल है' प्रयोग..

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषदेचे १९ वे राज्यस्तरीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलन, शुक्रवार दिनांक २७ नोव्हेंबर २६ रोजी आचार्य प्र के अत्रे नाट्यगृह सासवड येथे भरले होते. साहित्य संमेलनाध्यक्षपदी साहित्यिक, ज्येष्ठ कवी इंद्रजीत भालेराव होते. आयोजक,ज्येष्ठ कवी दशरथ यादव, राजेश पवार इ. मान्यवर व्यासपीठावर विराजमान होती.

साहित्य संमेलन मध्ये कथाकथन, कवी संमेलन, विविध क्षेत्रातील मान्यवरांचे पुरस्कार असे कार्यक्रम संपन्न झाले.

सदर सम्मेलन मध्ये कथाकथनकार श्री बाळासाहेब देशमुख यांनी पापी पेट का सवाल है ही दुष्काळग्रस्त शेतकऱ्याची व्यथा मांडणारी कथा सादर केली. रसवंती ग्रहाचा बैल जाणे, बैलाला समजून शेवंताला मारलेला आसुडाचा फटका, येत रहाणारी संकटे , अन् त्याला धैर्याने तोंड देणारा यशवंता शेतकरी आपणास आयुष्य जगण्याचा जीवन मंत्र देतो त्यावर भाष्य करणारी कथा बाळासाहेब देशमुख यांनी सादर केली. सकस कथानक, देहबोली, आवाजातील चढ उतार, उत्कृष्ट शब्द फेक याद्वारे कथा , संमेलन मध्ये लक्षवेधी ठरली. त्या प्रसंगी सारे संमेलनातील प्रज्ञावंत, साहित्य रसिक, मंत्रमुग्ध झाले. सदर कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव, सुभाष मोरे यांच्या शुभहस्ते कथालेखक बाळासाहेब देशमुख, यांना सन्मानित करण्यात आले.

गोमातेच्या सेवेसाठी सेवाप्रीतचा मायेचा हात

इसळकच्या ब्रह्मचैतन्य महाराज गोशाळेला एक दिवसाचा चारा–पाणी खर्च!



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– कार्तिक मासाचे औचित्य आणि जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन मुक्या जनावरांच्या सेवेसाठी सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या वतीने सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला. इसळक (ता. नगर) येथील निसर्ग सृष्टी गोपाल संस्था संचलित श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोशाळेला चारा वाटप करून संस्थेच्या वतीने गोशाळेचा एक दिवसाचा चारा व पाण्याचा संपूर्ण खर्च देण्यात आला. या उपक्रमातून ६१० गोवंशाच्या संगोपनासाठी मोलाचा हातभार लावण्यात आला.

सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या प्रकल्प प्रमुख स्वीटी पंजाबी यांच्या पुढाकाराने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय, अर्चना खंडेलवाल, सविता चड्डा, गीता नय्यर, गीता माळवदे, सीमा गुलाटी, ईशा मल्होत्रा, शीलू मक्कर, सिमी मक्कर, नंदिनी जग्गी, सुनीता सहगल, डॉ. बिंदू शिरसाठ, सुशीला मोडक, सुलभा मोडक, अभिलाषा मदान, कविता काथेड, आरती लोहाडे, वीणा झालानी, उर्मिला झालानी, पूनम धिंग्रा, सुरेखा मनियार, शिल्पा नय्यर, नीतू सलुजा आदी महिला उपस्थित होत्या.

निसर्ग सृष्टी गोपाल संस्था ही गोवंशाचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन या पवित्र कार्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. कत्तलखान्यांतून सोडवून आणलेल्या निराधार, भाकड, दूध न देणाऱ्या, अपंग तसेच वृद्ध गायींना संस्थेमार्फत निवारा, चारा, पाणी आणि आवश्यक वैद्यकीय व दैनंदिन देखभाल उपलब्ध करून दिली जाते. सध्या या गोशाळेत ६१० गोवंशाचे संगोपन केले जात आहे. इतक्या मोठ्या संख्येने गोवंशाचे संगोपन करणे हे मोठे आव्हान आहे. त्यासाठी दररोज सुमारे पाच टन चाऱ्याची आवश्यकता असून, चाऱ्यासाठी १५ हजार रुपये खर्च येतो. तसेच दररोज चार पाण्याच्या टँकरची आवश्यकता असून, त्यासाठी दोन हजार रुपये खर्च होतो. अशा प्रकारे चारा व पाण्यासाठी दररोज १७ हजार रुपयांचा खर्च करावा लागतो. दुष्काळी परिस्थितीत हा खर्च भागविणे गोशाळेसाठी मोठे आव्हान ठरत आहे.

ही गरज लक्षात घेऊन सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या वतीने गोशाळेचा एक दिवसाचा चारा व पाण्याचा संपूर्ण खर्च निसर्ग सृष्टी गोपाल संस्थेचे गौतम कराळे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. केवळ धार्मिक परंपरा म्हणून नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून गोसेवेचे महत्त्व जपत महिलांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला.

सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय म्हणाल्या की, गोमातेची सेवा ही केवळ धार्मिक श्रद्धेपुरती मर्यादित नसून ती माणुसकी आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देणारी आहे. दुष्काळाच्या काळात माणसांबरोबरच मुक्या जनावरांनाही अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

२६/११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना श्रध्दांजली

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात देशाच्या रक्षणासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शूर पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि जवानांच्या स्मृतींना अहिल्यानगरमध्ये भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. लायन्स क्लब ऑफ अहमदनगर, लिओ क्लब, मराठी पत्रकार परिषद, गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील हुतात्मा स्मारक येथे श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुष्पचक्र अर्पण करून तसेच मेणबत्त्या प्रज्वलित करून शहीद वीरांना आदरांजली वाहण्यात आली.

उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते हुतात्मा स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष हरजितसिंह वधवा, सचिव हरिश हरवाणी, खजिनदार विजय कुलकर्णी, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य कोषाध्यक्ष मन्सूर शेख, प्रकल्प प्रमुख सुनील छाजेड, धनंजय भंडारे, अरविंद पारगावकर, दिलीप कुलकर्णी, जालिंदर बोरुडे, रयत शिक्षण संस्थेच्या जिजामाता कन्या निवासच्या प्रमुख ज्योती मोकळ, बिट्टू मनोचा, प्रशांत मुनोत, कैलाश नवलानी, आशा पालवे, साहेबराव काते, दीपिका शेलार, राजेंद्र घोडके, लिओ क्लबचे अध्यक्ष हर्षवर्धन किथानी, गुरनूरसिंह वधवा आदींसह नागरिक उपस्थित होते.

शहीद जवानांच्या बलिदानाचे स्मरण करत उपस्थितांनी त्यांच्या शौर्याला मानवंदना दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी रयत शिक्षण संस्थेच्या जिजामाता कन्या निवासमधील विद्यार्थिनींनी पुलवामा दहशतवादी हल्ल्यातील शहीदांच्या बलिदानाला अभिवादन करत 'ऑपरेशन सिंदूर'मधील भारतीय सैन्याच्या धाडसी एअर स्ट्राइकवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. या सादरीकरणातून भारतीय सैन्याचे शौर्य, देशभक्ती आणि दहशतवादाविरुद्धचा निर्धार प्रभावीपणे व्यक्त करण्यात आला.

प्रास्ताविकात अरविंद पारगावकर म्हणाले की, भारताची शांतता आणि एकात्मता भंग करण्यासाठी पाकिस्तानकडून सातत्याने दहशतवादी कारवाया केल्या जात आहेत. मात्र, भारतीय जवान आणि पोलीस दलाने प्रत्येक संकटाचा धैर्याने सामना करत दहशतवाद्यांचे मनसुबे उधळून लावले आहेत. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईत झालेला दहशतवादी हल्ला हा देशाच्या इतिहासातील अत्यंत वेदनादायी प्रसंग होता. या हल्ल्याचा मुकाबला करताना पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि जवानांनी दाखवलेले अतुलनीय धैर्य व शौर्य कायम स्मरणात राहील. त्यांच्या बलिदानाचे स्मरण करण्यासाठी हा अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. पाहुण्यांचे स्वागत मराठी पत्रकार परिषदेचे राज्य कोषाध्यक्ष मन्सूर शेख यांनी केले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा
फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक

ग्रामीण शिक्षणाचा चेहरा बदलण्यासाठी धडपडणाऱ्या श्रीनिवास एल्लाराम सरांच्या कार्यावर राज्याची गौरवमुद्रा

अहिल्यानगर - शिक्षक म्हणजे केवळ



पाठ्यपुस्तकातील ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणारी व्यक्ती नव्हे, तर त्यांच्या स्वप्नांना दिशा देणारा, सुप्त क्षमतांना वाव देणारा, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला योग्य व्यासपीठ मिळवून देणारा आणि शिक्षणव्यवस्थेत सकारात्मक परिवर्तन घडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असणारा समाजशिल्पकार! या विचाराला आपल्या कार्यातून मूर्त स्वरूप देत ग्रामीण शिक्षणाच्या क्षेत्रात नावीन्यपूर्ण प्रयोग, डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, शैक्षणिक संशोधन आणि राज्यस्तरीय शैक्षणिक योगदानाच्या माध्यमातून स्वतंत्र ओळख निर्माण करणारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मांडवे, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर येथील उपक्रमशील, प्रयोगशील आणि तंत्रस्नेही शिक्षक श्रीनिवास शशिकला भूमराज एल्लाराम यांच्या उल्लेखनीय कार्यावर महाराष्ट्र शासनाने गौरवाची मोहोर उमटविली आहे. महाराष्ट्र शासनाच्या प्रतिष्ठेच्या क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२५-२६ साठी त्यांची निवड जाहीर झाली आहे. येत्या ३ डिसेंबर २०२६ रोजी मुंबई येथे आयोजित राज्यस्तरीय समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभेचे सभापती राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, राज्यमंत्री पंकज भोयर, शिक्षण विभागाचे सचिव, शिक्षण आयुक्त तसेच शिक्षण विभागातील वरिष्ठ संचालक यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. एक लाख रुपये रोख, मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यापासून ते राज्याच्या शैक्षणिक धोरणात्मक, संशोधनात्मक आणि शैक्षणिक सामग्री निर्मितीच्या प्रक्रियेत योगदान देण्यापर्यंतचा एल्लाराम सरांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. एका ग्रामीण जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षकाने आपल्या जिद्दीच्या, कल्पकतेच्या, मेहनतीच्या आणि सतत नवनवीन शिकण्याच्या वृत्तीच्या बळावर राज्याच्या शैक्षणिक विश्वात निर्माण केलेली स्वतंत्र ओळख निश्चितच अभिमानास्पद आहे.शिष्यवृत्ती मिशन आरंभ : ग्रामीण गुणवत्तेला दिले नवे पंख!

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही प्रचंड गुणवत्ता आणि बुद्धिमत्ता असते; मात्र योग्य संधी, दिशा, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाल्यास ही गुणवत्ता निश्चितच अधिक प्रभावीपणे विकसित होऊ शकते, या विश्वासातून एल्लाराम सरांनी शिष्यवृत्ती मिशन आरंभ हा अभिनव शैक्षणिक उपक्रम सुरू केला. ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी आवड निर्माण व्हावी, त्यांच्या बौद्धिक क्षमतांचा विकास व्हावा, शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी त्यांना नियोजनबद्ध तयारी करता यावी आणि मोठी स्वप्ने पाहण्याचे बळ मिळावे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. या मिशनच्या माध्यमातून शिष्यवृत्ती परीक्षांची तयारी, सराव चाचण्या, अध्ययन साहित्य, नियमित मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांच्या तार्किक व बौद्धिक क्षमतांचा विकास यावर त्यांनी विशेष भर दिला. केवळ परीक्षेतील गुण मिळविणे एवढाच मर्यादित दृष्टिकोन न ठेवता विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी, स्पर्धात्मक दृष्टिकोन, आत्मविश्वास आणि स्वतंत्र विचारक्षमता निर्माण करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही स्पर्धात्मक परीक्षांच्या माध्यमातून आपले कर्तृत्व सिद्ध करता येते, हा विश्वास निर्माण करण्याचे काम या उपक्रमातून होत आहे.

डिजिटल शिक्षणाचा प्रभावी वापर : तंत्रज्ञान बनले अध्ययनाचे सशक्त माध्यम!

शिक्षणाच्या बदलत्या स्वरूपाची आणि नव्या शैक्षणिक धोरणातील तंत्रज्ञानाच्या महत्त्वाची जाणीव ठेवून एल्लाराम सरांनी डिजिटल शिक्षण, संगणकाधारित अध्ययन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापराला प्राधान्य दिले. संगणक प्रयोगशाळा, डिजिटल शैक्षणिक साधने आणि दृक-श्राव्य माध्यमांचा उपयोग करून विद्यार्थ्यांचे अध्ययन अधिक

'बालविवाह मुक्त भारत' या चळवळीत सहभागी व्हा

मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांचे आवाहन । बालविवाह प्रतिबंधक व्हिडिओ नाटुकली प्रकाशन सोहळा संपन्न



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– येथील सुप्रसिद्ध नेत्रतज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सुधा कांकरिया लिखित ''औंदा लग्नाचा इचार नाय!'' या बालविवाह प्रतिबंधक व्हिडिओ रूपांतरीत नाटुकलीचे प्रकाशन अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या हस्ते झाले. निमित्त होते आंतरराष्ट्रीय बालविवाह निर्मूलन दिवसाचे. सदर कार्यक्रमाचे आयोजन रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर तसेच मानकन्हैया ट्रस्ट यांच्यावतीने करण्यात आले. सुरुवातीला लेखिका डॉ. सुधा कांकरिया यांनी स्वागत केले व बालविवाह मुक्त भारत अभियानाची माहिती सांगितली. २७ नोव्हेंबर हा दिवस संयुक्त राष्ट्राच्या वतीने जागतिक बालविवाह निर्मूलन दिवस म्हणून पाळला जातो. त्यानिमित्ताने जनजागृती व लोकशिक्षण व्हावे हा त्यामागचा हेतू आहे. आणि म्हणूनच ''औंदा लग्नाचा विचार नाय'' नाटुकलीचे रूपांतर व्हिडिओमध्ये करून सोशल मीडियाद्वारे त्याचा प्रचार व प्रसार करण्यात येत आहे. रोटरीचे अध्यक्ष सुहास क्षीरसागर यांच्या हस्ते मा. आनंद भंडारी यांचा सत्कार करण्यात आला. सदरप्रसंगी आनंद भंडारी म्हणाले की, बालविवाहामुळे मुलीच्या आरोग्याला धोका निर्माण होतो. तिचे शारीरिक व मानसिक नुकसान होते. माता व बालमृत्यूचे प्रमाण वाढते. सामाजिक असंतुलन निर्माण होते. हे थांबविण्यासाठी सर्वांनीच ''बालविवाह मुक्त भारत अभियाना''मध्ये सहभागी होण्याची आवश्यकता आहे. डॉ. सुधा कांकरिया लिखित ''औंदा लग्नाचा विचार नाय'' या नाटुकलीचे आत्ताच व्हिडिओ रूपांतराचे माझ्या हस्ते उद्घाटन झाले. सदर नाटुकली छोटी असूनही अत्यंत प्रभावी व सकारात्मक रीतीने परिणाम करणारी आहे. सोप्या भाषेत व भावपूर्ण रीतीने ती सादर झाली आहे. मी डॉ. सुधाताई तसेच रोटरी क्लब व मानकन्हैया ट्रस्ट यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. सोशल मीडियाच्या माध्यमातून ही जास्तीत जास्त व्यक्तींपर्यंत पोहोचविणे महत्त्वाचे आहे. भारतामध्ये नगर जिल्ह्याचे कार्य सर्वोत्तम आहे असेही ते म्हणाले. सदर कार्यक्रमात रोटरी क्लबचे अध्यक्ष सुहास शिरसागर, सौ. स्नेहल क्षीरसागर, सचिव संदीप ठोंबे, मानकन्हैया ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. प्रकाश कांकरिया, महिला बाल विकास अधिकारी यांच्यावतीने श्री गोसावी तसेच महिला भगिनी उपस्थित होत्या.

बाल आनंद मेळावा विद्यार्थ्यांसाठी आत्मविश्वास आणि व्यवहारज्ञान वाढविणारे व्यासपीठ – छायाताई फिरोदिया

नवीन मराठी शाळा विश्रामबागच्या बाल आनंद मेळाव्यात ३ लाखांची उलाढाल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– बाल आनंद मेळावा म्हणजे केवळ खरेदी-विक्रीचे ठिकाण नसून विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास, व्यवहारज्ञान आणि व्यावहारिक कौशल्ये विकसित करणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आनंदाबरोबरच संवाद कौशल्य, आर्थिक देवाणघेवाण, बेरीज-वजाबाकीचे गणित, नियोजन आणि कष्टाचे महत्त्व यांची प्रत्यक्ष अनुभूती मिळते. पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष अनुभवातून मिळणारे हे शिक्षण विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी केले.



अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळा विश्रामबाग व पूर्व प्राथमिक विभागाच्या वतीने आयोजित बाल आनंद मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत वर्षभर विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांना कष्टाचे महत्त्व, व्यवहारज्ञान, आर्थिक देवाणघेवाण, स्वच्छता आणि स्वयंरोजगाराची प्राथमिक माहिती मिळावी, या उद्देशाने या बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यासाठी विद्यार्थ्यांनी पालकांच्या सहकार्याने विविध खाद्यपदार्थ तयार करून विक्रीसाठी ठेवले होते.मेळाव्यात पाणीपुरी, भेळ, कचोरी, विविध स्नॅक्स, लस्सी, कुल्फी, पापडभाजी, केक, पुलाव, दहीवडा, बटाटेवडा अशा विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लक्षवेधी ठरले. याशिवाय भाजीपाला, स्टेशनरी आणि मनोरंजनात्मक खेळांचेही स्टॉल विद्यार्थ्यांनी उभारले होते. प्रत्येक स्टॉलवर विद्यार्थी उत्साहाने ग्राहकांशी संवाद साधताना, वस्तूंची माहिती देताना आणि विक्रीचे व्यवहार करताना दिसत होते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास आणि आनंद ओसंडून वाहत होता. विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थ, भाजीपाला, खेळ, स्टेशनरी आदींचे १२५ पेक्षा अधिक स्टॉल उभारले होते. या स्टॉलच्या माध्यमातून तब्बल तीन लाख रुपयांची उलाढाल झाली. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून आणि मेहनतीतून साकारलेल्या या उपक्रमाला सर्व स्तरांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

विशेष म्हणजे, शासनाच्या एक भारत श्रेष्ठ भारत या उपक्रमांतर्गत अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी ओडिशा राज्याच्या खाद्यसंस्कृतीची ओळख करून देणारा विशेष खाद्य महोत्सव स्टॉल उभारला होता. या मेळाव्यास प्रशालेतील पालक व विद्यार्थ्यांसह भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल, रुपीबाई बोरा न्यू इंग्लिश स्कूल तसेच किशोर संस्कृत संवर्धिनी प्रशालेतील शिक्षक, अध्यापक विद्यालयातील विद्यार्थी आणि पालकांनी आवर्जून भेट दिली. विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत त्यांनी विद्यार्थ्यांच्या स्टॉलवर मोठ्या प्रमाणात खरेदी केली. त्यामुळे संपूर्ण शालेय परिसरात उत्साह, आनंद आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. मेळाव्याचे उद्घाटन संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे प्राचार्य कैलास साबळे, रुपीबाई बोरा न्यू इंग्लिश स्कूलचे प्राचार्य रविकिरण भांड, पर्यवेक्षक विष्णु गिरी, नवीन मराठी शाळा विश्रामबाग मुख्याध्यापिका विद्या गांगर्डे, वनिता गोत्राळ , पूर्व प्राथमिक इन्चार्ज अर्चना गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. बाल आनंद मेळावा यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक निकम जितेंद्र, ढोकळे पाारुनाथ, पाटोळे लिना, तिवारी अनिता, माने मनिषा, कराळे पूजा, कवडे शिवाजी, कासार योगिता, जोशी कविता, धाडगे मयुर, मदने वैभव, देशपांडे विशाल, क्षीरसागर अश्विनी, , ऋषी अंजली, पानपाटील पूजा, लोखंडे उषा, गिरे पल्लवी, झेंडे सोनाली, सोनवणे चंद्रकांत, साबळे विशाल, देसाई ऋतिक व सेवक वर्ग व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

भाळवणी शाळेतील उपक्रमशील शिक्षिका निलम सुंबे यांना महाराष्ट्र शासनाचा राज्य आदर्श शिक्षिका पुरस्कार जाहीर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पारनेर– पारनेर तालुक्यातील भाळवणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील राज्यस्तरीय आयडॉल उपक्रमशील शिक्षिका निलम आप्पासाहेब सुंबे यांची महाराष्ट्र शासनाच्या पुणे विभागातून प्रतिष्ठेच्या 'क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षिका पुरस्कारसाठी निवड झाली आहे. शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल ३ डिसेंबर रोजी मुंबई येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार ,शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे ,शिक्षण राज्यमंत्री ,शिक्षण सचिव ,शिक्षण आयुक्त ,शिक्षण संचालक यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

निलम सुंबे यांनी मिशन आपुलकीच्या माध्यमातून भाळवणी शाळेचा लोकसहभागातून शाळेचा कायापालट केला आहे. शाळेत आयडियल सेंटर लॅब, इंटरॲक्टिव्ह पॅनल, सुसज्ज ग्रंथालय, आकर्षक कमान आणि प्रवेशद्वार यांसारख्या भौतिक सुविधा त्यांनी उपलब्ध करून दिल्या.त्यांच्या शैक्षणिक यशोगाथेची शासनाच्या मिपा संस्थेमार्फत निवड होऊन ती च्या राष्ट्रीय वेब पोर्टलवर प्रसिद्ध झाली आहे. त्यांनी



इंटरनॅशनल कॉन्फरन्समध्ये शोधनिबंध () व पोस्टर प्रेझेंटेशन उत्कृष्टपणे सादर केले असून, राष्ट्रीय स्तरावरही शोधनिबंध सादर केले आहेत. तसेच शासनाच्या 'जीवन शिक्षण' मासिकात आणि 'शिक्षणागाथा' त्रैमासिकामध्ये राज्यस्तरावर त्यांचे अभ्यासपूर्ण शैक्षणिक लेख प्रसिद्ध झाले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजवण्यासाठी त्यांनी 'पुस्तक फराळ' उपक्रमातून ७५४ पुस्तके संकलित केली.शाळेत सुसज्ज असे ग्रंथालय तयार केले.याशिवाय कोडयुक्त बोलणारी परसबाग, रांगोळीतून विज्ञान, एक पत्र इस्रोच्या वैज्ञानिकांना, प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग, स्वच्छता मॉनिटर, वीरगाथा कॉर्नर आणि शिकू आनंदे यांसारखे अनेक अभिनव उपक्रम त्यांनी यशस्वीपणे राबवले.

त्यांच्या अनुभवात्मक शिक्षणातून क्षमतावर्धन या प्रकल्पास शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन मिळाली आहे. त्यांनी दीक्षा पोर्टल, चॅनल, पोर्टल, बालभारती आभासी वर्ग आणि निपुण महाराष्ट्र ॲपसाठी ई-साहित्य व अभ्यासक्रम निर्मितीत मोठे योगदान दिले आहे.निलम सुंबे यांच्या निवडीबद्दल अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, गुजरात राज्यात आपल्या कार्याचा ठसा उमटविणारे जिल्हा पोलीस अधीक्षक प्रशांत सुंबे ,संगमनेर डायट प्राचार्य डॉ. राजेश बनकर, राज्याचे माजी शिक्षण संचालक दिनकर टेमकर, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाचे प्रभारी शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे, माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड, पारनेरचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी विनोद लाळगे, शिक्षण विस्तार अधिकारी भाऊसाहेब पाचारणे, केंद्रप्रमुख उत्तम फंड, शाळेचे मुख्याध्यापक, भाळवणी गावच्या सरपंच, उपसरपंच, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य, सर्व ग्रामस्थ आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

गोमातेच्या चाऱ्यासाठी मदतीचा हात; जय माता दी सेवा प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

कोपरगाव– समाजात अनेक संस्था आपल्या परीने सामाजिक कार्यात योगदान देत असतात. मात्र, समाजातील गरजू घटकांच्या अडचणी समजून घेत त्यांना मदतीचा हात देणे, सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबवणे आणि सेवाभावाची परंपरा कायम ठेवणे हे काम सातत्याने करणाऱ्या संस्थांचे योगदान निश्चितच महत्त्वाचे ठरते. जय माता दी सेवा प्रतिष्ठान, नाशिक ही संस्था देखील विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजहिताचे कार्य करत असून, सामाजिक कार्यासोबतच मुक्या प्राण्यांच्या सेवेसाठीही संस्थेने पुढाकार घेतला आहे. याच भावनेतून प्रतिष्ठानच्या वतीने श्री दत्त साई गोशाळेतील गोमातांच्या चाऱ्यासाठी आर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली.

जय माता दी सेवा प्रतिष्ठानच्या कार्याची विशेष बाब म्हणजे सामाजिक जाणीव आणि सेवाभावाला दिलेले महत्त्व. समाजातील गरजू व्यक्तींना मदत करणे, सामाजिक प्रश्नांबाबत संवेदनशील भूमिका घेणे आणि विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून समाजाशी जोडलेले राहणे, अशा कार्यातून संस्था आपली सामाजिक बांधिलकी जपत आहे. समाजाच्या गरजेनुसार मदतीसाठी पुढे येण्याची संस्थेची भूमिका निश्चितच उल्लेखनीय आहे.

सामाजिक कार्य करताना केवळ माणसांपुरतेच मर्यादित न राहता मुक्या जीवांच्या सेवेलाही प्राधान्य देणे ही संस्थेच्या कार्याची आणखी एक महत्त्वाची बाजू आहे.



गोशाळेतील जनावरांच्या चारा-पाण्याची व्यवस्था करणे आणि त्यांचे संगोपन करणे ही मोठी जबाबदारी असते. अशा वेळी संस्थेने पुढाकार घेत केलेली आर्थिक मदत गोशाळेसाठी निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. मुक्या जीवांची भूक ओळखून त्यांच्या सेवेसाठी मदतीचा हात पुढे करणे, ही देखील माणुसकीचीच एक जाणीव आहे. आजच्या काळात अनेक सामाजिक प्रश्नांवर चर्चा होत असताना प्रत्यक्ष कृतीतून समाजासाठी योगदान देणाऱ्या संस्थांची भूमिका महत्त्वाची ठरते. जय माता दी सेवा प्रतिष्ठान विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून हीच सेवाभावी भावना जपत असून, संस्थेच्या अशा कार्यामुळे समाजातील इतर संस्था आणि दानशूर व्यक्तींनाही सामाजिक कार्यासाठी प्रेरणा मिळू शकते. समाजातील गरजू घटकांपासून ते मुक्या प्राण्यांपर्यंत आपुलकीचा हात पोहोचवण्याचा संस्थेचा हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे. यावेळी जय माता दी सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अशोक नाना पाटील, सचिव तुकाराम हिरालाल कोळेकर, खजिनदार सोमनाथ गर्भाजी गोडे, संचालक दत्तात्रय बबन गोंडे तसेच श्री दत्त साई गोशाळेचे अध्यक्ष राजेंद्र अनिल जोशी आदी उपस्थित होते.

'भारतीय अध्यात्म आणि संस्कृतीतूनच विश्वशांतीचा संदेश'– डॉ. श्रीपाल सबनीस

अॅड. डी.डी. घोरपडे लिखित व गणराज प्रकाशन प्रकाशित 'भारतीय संस्कृतीचा इतिहास' ग्रंथाचे प्रकाशन; सिंधू संस्कृतीपासून भागवत धर्मापर्यंतचा भारतीय विचारांचा प्रवास 'भारतीय संस्कृतीचा इतिहास'

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– विश्वात सर्वत्र संघर्ष आणि युद्धाचे वातावरण निर्माण झाले असून, मनातील युद्ध आणि जगातील युद्ध संपण्याचे नाव घेत नाही. मात्र, विश्वाला आणि मानवाला खऱ्या अर्थाने शांतता मिळवायची असेल, तर अध्यात्म आणि मानवतावादी विचारांची नितांत गरज आहे. भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि तत्त्वज्ञान संपूर्ण विश्वाला शांततेचा संदेश देणारे असून, त्याचे प्रतिबिंब अॅड. डी.डी. घोरपडे लिखित गणराज प्रकाशन प्रकाशित 'भारतीय संस्कृतीचा इतिहास' या ग्रंथात उमटले आहे. विश्वाला कवेत घेणारे आत्मज्ञान या ग्रंथातून वाचकांसमोर येते, असे प्रतिपादन ८१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे (पुणे) अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

कै. सौ. मंगलाताई घोरपडे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त लेखक अॅड. डी.डी. घोरपडे लिखित व गणराज प्रकाशन प्रकाशित 'भारतीय संस्कृतीचा इतिहास' या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते नगर-छत्रपती संभाजीनगर रोडवरील चेतना लॉन येथे पार पडला. संत साहित्याचे अभ्यासक सद्गुरू साहेबराव आवारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास वेदशास्त्रमूर्ती ह.भ.प. अभिजीत महाराज गोंदिकर, खासदार नीलेश लंके, आमदार संग्राम जगताप, माजी आमदार पांडुरंग अभंग, साहित्यिक प्राचार्य डॉ. शिरीष लांडगे, ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, नेत्रदूत जालिंदर बोरुडे,



गणराज प्रकाशनाचे प्रकाशक गणेश भगत, माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले, राजेंद्र नागवडे, देशमुख देसाई, शुभांगीताई पाटील, दादाभाऊ चितळकर, दादासाहेब जगताप, बाबासाहेब भोस, सतीश पाटील, ज्येष्ठ विधिज्ञ अॅड. अशोक कोठारी, अॅड. अविनाश घोरपडे, अॅड. प्रवीण घोरपडे, अर्चना देशमुख, भानुदास घोरपडे आदी उपस्थित होते.

डॉ. सबनीस पुढे म्हणाले की, अणुबॉम्बच्या विनाशकारी शक्तीमुळे संपूर्ण मानवजात भयभीत आहे. चीन, रशिया आणि अमेरिका यांसारख्या महाशक्ती देखील शांततेसाठी एकत्र येऊ पाहत आहे. अशा परिस्थितीत भारताची भूमी ही आश्रय, श्रद्धा आणि आध्यात्मिक विचारांची भूमी म्हणून जगासमोर उभी राहते. भारतीय विचारधारा मानवतेला एकत्र आणण्याचे आणि विश्वशांतीचा मार्ग दाखविण्याचे सामर्थ्य बाळगते. भारतीय संस्कृतीचा अभ्यास केवळ इतिहास जाणून घेण्यासाठी नसून, वर्तमानातील संघर्ष समजून घेऊन भविष्याला योग्य दिशा देण्यासाठीही महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

भारतीय संस्कृती ही विविध विचारधारा आणि तत्त्वज्ञानांना सामावून घेणारी व्यापक जीवनपद्धती आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. शिरीष लांडगे यांनी केले. ते म्हणाले की, भारतीय संस्कृतीचा इतिहास समजून घेताना केवळ राजे, राजवटी, युद्धे आणि सत्तांतरांचा विचार करून चालत नाही, तर या भूमीत विकसित झालेल्या वैचारिक, आध्यात्मिक आणि सामाजिक परंपरांचाही अभ्यास करावा लागतो. वेद, उपनिषदे, संत साहित्य आणि विविध संप्रदायांनी भारतीय समाजाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात सद्गुरू साहेबराव आवारे म्हणाले की, भारतीय संस्कृतीचे खरे सामर्थ्य तिच्या अध्यात्मिक परंपरेत, संत विचारांत आणि सर्वसमावेशक जीवनदृष्टीत आहे. भारतीय संतांनी केवळ भक्तिमार्ग सांगितला नाही, तर समाजाला समता, मानवता, प्रेम आणि सदाचाराचा संदेश दिला. वेद-उपनिषदांपासून संत साहित्यापर्यंतचा प्रवास हा माणसाला स्वतःची ओळख करून देणारा आणि जीवनाचा खरा अर्थ समजावून सांगणारा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ह.भ.प. अभिजीत महाराज गोंदिकर म्हणाले की, आई-वडील आपल्यातून निघून गेल्यानंतर त्यांच्या प्रेमाची, जिव्हाळ्याची आणि त्यागाची खरी किंमत जाणवते. ते जवळ असताना त्यांच्या मायेचे महत्त्व अनेकदा लक्षात येत नाही; मात्र त्यांच्या जाण्यानंतर निर्माण झालेली पोकळी त्यांच्या स्थानाची जाणीव करून देते. भारतीय संस्कृतीमध्ये आई-वडिलांना ईश्वराचे स्थान देण्यात आले आहे. कै. मंगलाताई घोरपडे यांच्या स्मृतींना उजाळा देताना त्यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनी ज्ञान आणि संस्कृतीचा वारसा जपणाऱ्या ग्रंथाचे प्रकाशन होणे ही विशेष अर्थपूर्ण बाब असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविकात लेखक अॅड. डी.डी. घोरपडे यांनी पत्नी कै. मंगलाताई यांच्या निधनाने निर्माण झालेल्या दुःखाला उजाळा देत त्यांच्या सहजीवनातील आठवणी आणि जीवनप्रवास उलगडला. पत्नीच्या प्रथम पुण्यस्मरण दिनी त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी ज्ञानसंस्कृतीचा वारसा पुढे नेणारा ग्रंथ प्रकाशित होत असल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले. यापूर्वी त्यांचे 'अमृत साधना' हे पहिले पुस्तक प्रकाशित झाले असून, 'भारतीय संस्कृतीचा इतिहास' हा त्यांचा दुसरा ग्रंथ आहे.

सनातनी विचारांचा पुरस्कार करून राष्ट्र सेवा दलाच्या विचारधारेची बदनामी थांबवा - शिवाजी नाईकवाडी

राष्ट्र सेवा दलाच्या अनधिकृत पदाधिकाऱ्यांच्या राजीनाम्याची मागणी; अहिल्यानगरमध्ये निषेध सभा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– राष्ट्र सेवा दलाच्या विचारधारेपासून दूर जाऊन सनातनी विचारांचा पुरस्कार करणाऱ्या कथित पदाधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीचा निषेध नोंदवत, त्यांनी त्वरित पदांचे राजीनामे द्यावेत, अशी मागणी राष्ट्र सेवा दल अहिल्यानगर शाखेच्या वतीने करण्यात आली. सावेडी येथील स्वातंत्र्यसैनिक रावसाहेब पटवर्धन स्मारकात त्यांच्या पुतळ्यासमोर निषेध सभा घेण्यात आली. राष्ट्र सेवा दलाच्या ऐतिहासिक विचारांचा, लोकशाही, समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष मूल्यांचा गैरवापर थांबवावा, अशी भूमिका यावेळी उपस्थितांनी मांडली.

राष्ट्र सेवा दलाचे जिल्हा प्रतिनिधी शिवाजी नाईकवाडी यांनी यावेळी बोलताना सांगितले की, राष्ट्र सेवा दल ही स्वातंत्र्यलढ्यापासून सामाजिक परिवर्तनापर्यंत योगदान देणारी संघटना असून, साने गुरुजींच्या विचारांतून तिची उभारणी झाली आहे. समता, बंधुता, विवेकवाद, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही मूल्ये ही सेवा दलाची मूलभूत ओळख आहे. अशा संघटनेच्या माध्यमातून सनातनी विचारांचा पुरस्कार करणे आणि संघटनेच्या मूळ उद्दिष्टांशी विसंगत भूमिका घेणे, ही बाब अत्यंत निषेधार्ह आहे. संघटनेच्या विचारांशी प्रामाणिक राहून कार्य करण्याऐवजी पदांचा वापर राजकीय स्वार्थासाठी होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

नाईकवाडी पुढे म्हणाले की, राष्ट्र सेवा दलाच्या नावाने पुरस्कार जाहीर करताना संबंधित व्यक्तींच्या विचारांची आणि कार्याची योग्य पडताळणी होणे अपेक्षित आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षात त्यांच्या सत्यशोधक विचारांशी विसंगत भूमिका घेणे, ही कार्यकर्त्यांसाठी वेदनादायी बाब आहे. सेवा दलाच्या विचारांशी निष्ठा असणाऱ्या जुन्या, नव्या आणि पूर्णवेळ कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन संघटनेचे काम पुढे नेले पाहिजे. स्वयंघोषित पदाधिकाऱ्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून त्वरित राजीनामा द्यावा, अन्यथा सेवा दलाच्या विचारांचे रक्षण करण्यासाठी संघर्ष अधिक तीव्र केला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

पुरुषोत्तम जाधव यांनी आपल्या मनोगतात राष्ट्र सेवा दलाची वैचारिक परंपरा जपण्याची गरज व्यक्त केली. संघटनेच्या नावाचा आणि पदांचा वापर करून तिच्या मूळ विचारधारेपासून दूर जाणाऱ्या प्रवृत्तींना थारा दिला जाऊ नये. सेवा दल ही कोणत्याही व्यक्तीची किंवा राजकीय स्वार्थाची संघटना नसून समाज परिवर्तनासाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची चळवळ आहे. त्यामुळे संघटनेची प्रतिष्ठा, वैचारिक स्वायत्तता आणि ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी सर्व सेवा दल सैनिकांनी एकजुटीने पुढे येण्याचे आवाहन त्यांनी केले.

या निषेध सभेत ॲड. रवींद्र शितोळे, विवेक पवार, बाजीराव जाधव, गोविंद आडम, बापू जोशी, श्रीकांत वंगारी,अनघा राऊत, अपर्णा क्षीरसागर, श्रीकांत चिंतल, सुरेश गुंडू आदी सेवा दल सैनिक उपस्थित होते. उपस्थितांनी राष्ट्र सेवा दलाच्या विचारांशी प्रतारणा करणाऱ्या कथित पदाधिकाऱ्यांचा निषेध नोंदवत, संघटनेच्या मूळ मूल्यांचे संरक्षण करण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला.

शेतीपूरक उद्योग व्यवसायासाठी व महिला बचत गटांना सेंट्रल बँकेने ३५ कोटी रुपयांचे कर्जाचे वितरण

राष्ट्रव्यापी कृषी कर्ज आऊटरीच कॅम्प उत्साहात संपन्न महिला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया अहिल्यानगरच्या वतीने घारगाव ता. श्रीगोंदा येथे आयोजित राष्ट्रव्यापी कृषी कर्ज आऊटरीच कॅम्प उत्साहात संपन्न झाला या कॅम्पला महिला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला यामध्ये सेंट्रल बँक ऑफ इंडिया च्या वतीने शेतीपूरक उद्योग व्यवसायासाठी व महिला बचत गटांना ३५ कोटी रुपयांचे कर्जाचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा सहकारी बँकेचे संचालक दत्तात्रेय पानसरे बँकेचे क्षेत्रीय प्रबंधक नरेश कुमार दुबे ,उपविभागीय कृषी अधिकारी किरण मांगडे, कृषी व ग्रामीण विकास अधिकारी हरीपाल अडसूळ ,अग्रणी बँक व्यवस्थापक रितेश वाकोडे, आदींसह बँक अधिकारी व कर्मचारी महिला बचत गटातील सदस्य व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जिल्हा सहकारी बँकेचे संचालक दत्तात्रय पानसरे म्हणाले की कर्ज वेळेवर फेडल्यास संस्था सक्षम होतात आणि पर्यायाने शेतकऱ्यांचाही फायदा होतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज वेळेवर फेडून शिस्त राखावी शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी शेती पूरक उद्योग व्यवसायाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी महिला बचत गटाच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना राबवण्याचे काम सेन्ट्रल बँक करत आहे. त्याचा फायदा शेतकऱ्यांनी व महिला बचत गटांनी आपल्या उत्पन्न वाढीसाठी करून घ्याव तालुक्यात सेन्ट्रल बँकेच्या नऊ शाखा असून त्यापैकी कोळगाव, घारगाव, पिंपळगाव, बेलवंडी, मढेवडगाव व श्रीगोंदा या शाखा एकाच रेषेत आहेत, तर दुसऱ्या बाजूला मांडवगण व तांदळी येतात. या भागातील नदीपट्ट्यात शाखा नसल्याने या दोन भागांत दोन-तीन नवीन शाखा सुरू करण्याची विनंती शेतकऱ्यांच्या वतीने त्यांनी यावेळी केली.

सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक नरेशकुमार दुबे म्हणाले की बचत गट,नारी शक्ती आणि कृषीपूरक प्रकल्पांना सेंट्रल बँक ऑफ इंडियाने मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे

बचत गटांनी आपली खाती आणि दैनंदिन नोंदी अद्ययावत ठेवाव्यात यासाठी सीआरपी/डीआरपी आणि कृषी अधिकारी सहकार्य करतील बचत गटासोबतच वैयक्तिक पातळीवर काम करू इच्छिणाऱ्या महिलांसाठी नारी शक्ती सारख्या योजनांचा लाभ घ्यावा कृषी प्रक्रिया उद्योग ज्यूस निर्मिती तसेच श्रीगोंदा परिसरातील डाळिंब, द्राक्षे यांसारख्या फळांसाठी कोल्ड स्टोरेज व वेअरहाऊससारखे प्रकल्प उभारण्यासाठी बँकेमध्ये कर्ज सुविधा उपलब्ध आहे . पाणीटंचाईवर मात करण्यासाठी ठिबक सिंचन व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्याचे आवाहन करत या भागातील कार्यक्षेत्रात सुमारे १० शाखा व्यवस्थापक शाखांचे अधिकारी कार्यरत आहेत. बँकेकडे तरुण कार्यबल तसेच ॲग्रीकल्चर फायनान्स ऑफिसर उपलब्ध असून सरकारी बँकांच्या कामकाजाबाबत जुन्या गैरसमजातून बाहेर पडून नागरिकांनी आपल्या जवळच्या मुख्य शाखेशी किंवा मिनी शाखेशी (बीसी/बँकिंग करस्पॉन्डंट) संपर्क साधावा असे आवाहन केले.

सत्तावीस हजार स्वामी चरित्र पारायणाचा झाला जागतिक विक्रम !

बोल्हेगाव स्वामी समर्थ केंद्राला 'विनर्स बुक ऑफ इंडिया'कडून समारंभपूर्वक प्रमाणपत्र केले प्रदान



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– येथील बोल्हेगाव परिसरातील संत तुकाराम नगरमधील स्वामी समर्थ सेवा केंद्रात (दिंडोरी प्रणित) पार पडलेल्या तब्बल २७ हजार सामूहिक स्वामी-चरित्र पारायण सोहळ्याच्या अभिनव उपक्रमाचा जागतिक विक्रम नोंदविण्यात आला असून, त्याबाबतचे प्रमाणपत्र केंद्राला नुकतेच समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले आहे.

केंद्राचे प्रमुख समन्वयक चंद्रशेखर लोळगे काका यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली २५ वर्षांपूर्वी या केंद्राची स्थापना करण्यात आली. केंद्राच्या २५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीच्या पार्श्वभूमीवर गेल्या २६ जुलै २०२६ रोजी केंद्राच्या परिसरात २५ हजार सामूहिक स्वामी चरित्र पारायण सोहळ्याचा संकल्प चंद्रशेखर लोळगे काका यांनी सोडला होता. या अभिनव उपक्रमाला अहिल्यानगर शहर व जिल्ह्यासह पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव या शेजारील जिल्ह्यातील स्वामी समर्थ महाराजांचे भक्त व सेवेकरी यांचा उदंड प्रतिसाद मिळाला. परिणामी २५ हजारांऐवजी तब्बल २७ हजार भाविकांनी सामूहिक स्वामी चरित्र पठण केले.

विनर्स बुक ऑफ इंडिया या संस्थेने या उपक्रमाची जागतिक विक्रम म्हणून नोंद केली आहे. विनर्सचे अध्यक्ष व आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ध्यानधारणा प्रशिक्षक डॉ. दीपक हारके यांच्या हस्ते या उपक्रमाचे सर्वेसर्वा चंद्रशेखर लोळगे काका यांना जागतिक विक्रमाबाबतचे प्रमाणपत्र केंद्राच्या पटांगणात पार पडलेल्या एका भव्य विशेष समारंभात प्रदान करण्यात आले. लोळगे काका व डॉ. हारके यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

केंद्रातील हरिदास कुमटकर, देवीदास जाधव, अभिजीत नरसाळे, संदीप दुधाडे, किरण भुसे, बाळासाहेब पोकळे, महेश गोसावी, महेश नारखेडे, सतीश अनाप, जालिंदर आरगडे, दीपक लांडे, यशवंत उंडे, सुभाष घोरपडे, आप्पासाहेब गांगुर्डे, लहू लोणकर, नानासाहेब खरात, बाबासाहेब गवांदे, सुरेश आदमाने यांच्यासह केंद्रातील सेवेकरी बंधू-भगिनींनी या उपक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. अशा प्रकारचा जागतिक विक्रम करणारे बोल्हेगाव फाटा येथील स्वामी समर्थ केंद्र हे राज्यातील पहिलेच केंद्र ठरले असल्याचे भाविकांनी यावेळी स्पष्ट केले.

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील तिर्थक्षेत्रांच्या पायाभूत सुविधांच्या कामासाठी निधीची कमरता भासणार नाही - ना.राधाकृष्ण विखे पाटील

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



नेवासा– कुंभमेळ्याच्या निमिताने शिर्डी आणि शनिशिंगणापूर देवस्थानने एकमेकांत सामंजस्य करार करून भाविकांना माहीतीची उपलब्धता करून द्यावी. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील तिर्थक्षेत्रांच्या पायाभूत सुविधांच्या कामासाठी निधीची कमरता भासणार नाही. कुंभमेळ्याच्या निमिताने पूर्ण होणारी विकास काम परिसराच्या विकासाला नवी दिशा देणारी ठरतील असा विश्वास जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला. सिहंस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुमारे ५९कोटी ४०लाख रुपयांच्या निधीतून विकसित होत असलेल्या शिंगणापूर ते कांगोणी राज्यमार्ग ६६,सोनई घोडेगाव काकणे राज्य मार्ग ६६ वरील लहान पुलाचे बांधकाम,सोनई कांगोणी ते अहिल्यानगर संभाजीनगर रस्त्याचे मजबुतीकरण कांगोणी खरवंडी आणि खरवंडी वडाळा बहीरोबा मार्गाच्या मजबुतीकरण कामाचा शुभारंभ मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आला.आ.विठ्ठलराव लंघे,प्रभाकर शिंदे किसनराव गडाख,संभाजीराजे दहातोंडे अंकुशराव काळे,प्रताप चिंधे नगराध्यक्ष करणसिंह घुले भाऊसाहेब वाघ,ऋषिकेश शेटे, यांच्यासह कार्यकर्ते शेतकरी उपस्थित होते. आपल्या भाषणात मंत्री विखे पाटील म्हणाले की,प्रयागराज प्रमाणे नासिक येथील सिंहस्थ कुंभ पर्व अध्यात्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या ऐतिहसिक व्हावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नियोजन सुरू आहे.जिल्ह्याला असलेल्या अध्यात्मिक स्थळांचा यानिमित्ताने विकास करण्यासाठी पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणास विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. तिर्थक्षेत्रांच्या विकासामुळे परिसराच्या विकासाला नवी दिशा मिळेलच परंतू अध्यात्मिक पर्यटनातून रोजगाराच्या संधी निर्माण होतील.नासिकला येणारे भाविक शिर्डी आणि शनिशिंगणापूर येथे येणार असल्याने या दोन्ही देवस्थानाच्या नियोजनाचे काम अतिशय चांगल्या पध्दतीने होण्याची आवश्यकता आहे. दोन्ही देवस्थान जागतिक स्तरावचे आहेत.येणार्या भाविकांना माहीतीची उपलब्धता व्हावी म्हणून शिर्डी आणि शनिशिंगणापूर देवस्थानने एकमेकांत सामंजस्य करार करून सर्व माहीती वेबसाइटवर उपलब्ध करून देण्याची सूचना मंत्री विखे पाटील यांनी केली. समृध्दी महामार्ग झाल्यानंतर भाविकांना येणे अत्यंत सोयीचे झाले आहे.शिर्डी विमानतळाच्या इमारतीसाठी सातशे कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून,विमानतळाचा विस्तार होणार असल्याने त्याचा लाभ जिल्ह्यातील अध्यात्मिक पर्यटनाला होईल. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर खरीप आवर्तनाचे नियोजन अतिशय चांगल्या पध्दतीने झाले.तीस हजार हेक्टर क्षेत्राला त्याचा लाभ झाला.रब्बी हंगामाचे नियोजन करण्यात आले असून,१५०बंधारे भरून देण्याचे नियोजन असून, मंत्री.शिंगवे तुकाईचे सर्व्हेक्षण दोन महीन्यात पूर्ण करण्याच्या सूचना मंत्री विखे पाटील यांनी दिल्या. आ.विठ्ठलराव लंघे यांनी आपल्या भाषणात नेवासा तालुक्यात सुरू असलेल्या विकास कामांचा आढावा घेवून मागील दोन वर्षाच्या कार्यकाळात झालेल्या कामाचा आढावा घेवून श्रध्दा आणि भक्तीभावाने काम करण्याची भूमिका कायम ठेवली आहे. शनिशिंगणापूरच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही.

के. जी. महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– के. जी. महाविद्यालयात दिनांक २६ नोव्हेंबर २०२६ रोजी संविधान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाच्या परिसर सांचलिका डॉ. स्वाती मुनोत यांच्या हस्ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच यावेळी महाविद्यालयाच्या परिसर सांचलिका डॉ. स्वाती मुनोत यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे प्रतिज्ञा सामूहिक वाचन करण्यात आले.

विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाचे महत्त्व, संविधानातील मूलभूत हक्क व कर्तव्ये, लोकशाही मूल्ये, समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच लोकशाही मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश देण्यात आला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्नेहल बोरावके यांनी केले. आभार प्रदर्शन सौ. हर्षाली रासकर यांनी केले. यावेळी डॉ. वर्षा कीर्तने, प्रा.रोहिणी क्षीरसागर तसेच प्रा. चाकोते, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(पान १ वरून)

मामाच्या घरात भाच्यानेच केला हात साफ!

आदेश दिले. पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. तसेच डॉग स्कॉड, फिंगरप्रिंट आणि फॉरेन्सिक युनिटच्या मदतीने घटनास्थळाची पाहणी केली.

ही चोरी घरात कुटुंबातील सदस्य व नातेवाईक असतानाच झाल्याचे तपासात स्पष्ट झाले. त्यामुळे पोलिसांनी घरातील व्यक्तींची विश्वासात घेऊन चौकशी सुरू केली. या दरम्यान फिर्यादीच्या भाच्याच्या हालचाली पोलिसांना संशयास्पद वाटल्या. त्याला ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता त्यानेच चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीस गेलेले १४ लाख ४७ हजार ५०० रुपये किमतीचे सर्व सोन्या-चांदीचे दागिने हस्तगत केले आहेत. आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली असून, पुढील तपास सपोनि विशाल चिटणीस करत आहेत.

रक्तदान केल्याने अनेकांना जीवनदान मिळते- आमदार संग्राम जगताप

गजेंद्र सोनवणे,जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर,सह प्रमुख हरिभाऊ डोळसे,शिबिर संयोजक अमोल भांबरकर,श्री विशाल गणपती देवस्थान चे विश्वस्त प्रा.माणिक विधाते, गायत्री परिवाराचे प्रमुख काशिनाथ मोडे,प्रसिद्ध व्याख्याते दत्तात्रय वारकड,निसर्गसृष्टी गोपालन संस्थेचे सचिव गौतम कराळे,नगरसेवक गणेश कवडे,संतोष गेनाप्पा,पैलवान मनोज लोंढे,नगरसेवक सागर मुर्तडकर,बाळासाहेब पवार,डॉ.सागर बोरुडे, बाळासाहेब भुजबळ, राजकुमार जोशी,बाली जोशी, ओम पांडे, अरुण खिची, स्मिता बडवे,जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास मढीकर,शरद बळे, सोनाली खांडरे,डॉ.गोवर्धन पांडुळे,अनिल इवळे,संजय सागावकर,जितेंद्र लांडगे,सचिन मडके, सुनील पावले,विजय मानकर, चंद्रकांत मानकर, नीरज चांगटे,शेखर शेकटकर, चौपाटी कारंजा मित्र मंडळाचे अध्यक्ष महेश कुलकर्णी, अमोल भंडारे,सुचित भळगट,सागर रोहोकले, एडवोकेट पराग देशमुख, देविदास मुदगल,किरण कुलकर्णी, पत्रकार संजय सावंत अतुल लहारे किरण रोकडे,भैय्या भगत,ज्ञानेश्वर मगर, वर्षा मगर,अरविंद मुनगेल,सुरेंद्र सोनवणे,नरेंद्र सोनवणे, बुर्हानगरचे सरपंच श्री कर्डिले दीपक गायकवाड आदींसह यावेळी विश्व हिंदू परिषद,जिव्हेश्वर तरुण मंडळ, गायत्री परिवार,विचार भारती चौपाटी कारंजा मित्र मंडळ, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, अहिल्यानगर सकल माळी समाज संस्था,निसर्गसृष्टी गोपालन संस्था,निसर्ग भ्रमंती ग्रुप,जिव्हाळा प्रतिष्ठानचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुधीर लांडगे म्हणाले,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत वाढलेली जनकल्याण रक्तपेढी ही सेवाभावी वृत्तीने कार्य करणारी संस्था आहे. येथे थेलेसेमिया रुग्णांना मोफत रक्तपुरवठा केला जातो.ना नफा ना तोटा या तत्त्वावर गुणवत्तापूर्वक रक्तपुरवठा करणे हा उद्देश संस्थेचा आहे. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी जनकल्याण रक्तकेंद्राचे डॉ. योगिता पुंड,डॉ.हर्ष शाह,डॉ. गौरी जोशी,डॉ.वसंत झेंडे,अमित टकले,जनार्दन मदूर,शंकर खंडागळे,सुलभा पवळ,गया चव्हाण सिस्टर आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन दत्तात्रय वारकड यांनी केले.तर आभार डॉ. विलास मढीकर यांनी मानले.

आष्टीच्या व्यापारी कुटुंबातीलमहिलेचा अपघातात मृत्यू

येथे हलविण्यात आले. या अपघातात विद्या राजेंद्र जोशी यांना गंभीर दुखापत झाली होती. त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे नेत असताना त्यांची प्राणज्योत मालवली. राजेंद्र जोशी आणि कलावती जोशी यांच्यासह अन्य जखमींवर उपचार सुरु आहेत.

संगमनेरात किराणा दुकानातून साडेपाच लाखांचा गुटखा जप्त

संगमनेर शहर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून, त्याच्याविरुद्ध बीएनएस कलम १२३, २२३, २७४, २७५ व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुकुंदनगरला साडेपाचशे किलो गोमांस जप्त

यांच्या घरावरील पत्र्याच्या खोलीत गोमांस विक्री सुरू आहे. पथकाने घटनास्थळी छापा टाकला असता, एक इसम गोवंशीय जनावराच्या मांसाचे तुकडे करताना आढळून आला. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत इरफान एजाज कुरेशी (वय ४०, रा. अब्दुलरजा मशिदीजवळ, संयोगनगर, मुकुंदनगर) याला ताब्यात घेतले.

पोलिसांनी घटनास्थळावरून १ लाख ६५ हजार रुपये किमतीचे ५५० किलो गोमांस, ६०० रुपयांचे दोन सत्तूर व दोन चाकू आणि १ हजार रुपयांचा इलेक्ट्रिक काटा असा एकूण १ लाख ६६ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. चौकशीदरम्यान, जप्त केलेला हा माल झेंडीगेट येथील पप्पू फैयाज कुरेशी याच्या मालकीचा असल्याचे आरोपीने सांगितले. सध्या पप्पू कुरेशी फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१, ३२५, ३(५) सह महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम १९९५ (सुधारित २०१५) च्या कलम ५(क) आणि ९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महायुती सरकार ताजनापूर योजनेतून शेतकऱ्यांना न्याय देईल - ना.विखे पाटील

कार्यकर्त्यांशी बोलताना सांगितले. ताजनापूर उपसा सिंचन योजनेच्या तिसर्या टप्पा शेवगाव पाथर्डी तालुक्याकरीता ऐतिहसिक ठरणार असून,वर्षानुवर्ष दुष्काळाच्या सावटाखाली राहीलेल्या गावांना योजनेचा तिसरा टप्पा या गावांमधील शेतकऱ्यांच्या जीवनातील अमूलाग्र बदल करणारा ठरेल. भगवानगडाच्या पायथ्यापाशी ४६गावांच्या पाणी प्रश्नाबाबत नागपूर अधिवेशनाच्या दरम्यान बैठक घेणार असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी आश्वासित केले.

मंत्री विखे पाटील यांनी शेवगाव येथे टंचाई आढावा बैठकीत ताजनापूर उपसा सिंचन योजनेच्या तिसर्या टप्प्याच्या कामा संदर्भात शेतकऱ्यांना आश्वासित केले होते. त्याच्या कार्यवाहीला प्राधान्य देवून योजनेसाठी प्रशासकीय स्तरावर अवघ्या काही महीन्यात कार्यवाही सुरू झाल्याने दिलेल्या शब्दाची पूर्तता होणार असे त्यांनी ठामपणे सांगितले

निवासी अतिक्रमणे नियमित करण्याच्या हालचालींना वेग

देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतलाय. त्यामुळे मालमत्तांचे वाद कायमचे मिटणार आहेत. जमिनीच्या सातबाराच्या धर्तीवर स्वतंत्र ओळख आणि सदनिका धारकांना कायदेशीर हक्क देणारं व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड देण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यातील अंदाजे सात कोटी सदनिका धारकांना दिलासा मिळणार आहे.या कार्डमध्ये फ्लॅटची कुंडली, सदनिकेवर असलेल बँकेच कर्ज, गहाणखत, मालमत्ता कर किंवा सोसायटीची थकबाकी न्यायालयीन निर्बंध किंवा शासकीय देणी असल्यास त्याची थेट नोंद संबंधित प्रॉपर्टी कार्डवर होईल. बिल्डरचं कर्ज मुख्य नोंदीवर तर वैयक्तिक कर्ज संबंधित सदनिका धारकाच्या कार्डवर दिसेल. अधिकृत बांधकाम, मंजूर नकाशा आणि संबंधित कागदपत्र असलेल्या प्रकल्पाना हे कार्ड देण्यात येईल.

फ्लॅटमध्ये राहणाऱ्या घर मालकांना देतो आहे याचा जो ड्राफ्ट आहे तो आज पब्लिक डोमेनमध्ये महसूलच्या पब्लिक डोमेनमध्ये टाकतो आहे. ३० दिवस हा पब्लिक डोमेन मध्ये राहील आणि ज्या काही यामध्ये सूचना येतील हरकती येतील, त्यावर आम्ही अंतिम नियमावली पुढच्या दोन महिन्यात, एक महिना पब्लिक डोमेन, दोन महिने आम्ही आणि मग ही नियमावली तयार करून नियमामध्ये सुधारणा करून व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड या राज्यामध्ये लागू होईल, अशी माहिती देखील महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आहे.